# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 13/05/2020 (बुधवार)

(सकाळ)

**उमरेड येथे प्रतिबंधित सुगंधित तंबाखुच्या कारखान्यावर पोलीसांची धाड**
**स्थानिक गुन्हे शाखा,नागपूर ग्रामिण व अन्न व औषध प्रशासन विभागाची संयुक्त कारवाई**

स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांना गुप्त माहीतीदारा कडुन खात्रीशीर खबर मिळाली की, उमरेड येथील बुधवारपेठ येथील संतोष गिरडकर नावाचा इसम हा आपले घरातील एका खोलीमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित तंबाखुची मशिनव्दारे पॅकींग करून मोठया प्रमाणावर विक्री करीता साठवणुक करून ठेवलेली आहे. अशी माहीती मिळताच सदर ची बाब ही अन्न व औषध प्रशासनाशि निगडीत असल्याने तात्काळ सदरची माहीती संबंधित विभागाला दिली असता अन्न वा औषध निरीक्षक व त्यांचे चमु तसेच स्था.गु.शा.ना.ग्रा. येथील पथक यांनी संयुक्तरित्या योजना आखुन माहीतगाराने सांगीतल्या प्रमाणे संतोष गिरडकर, रा. बुधवारीपेठ उमरेड याचे राहते घराचे समोर असलेल्या त्याचेच जुन्या घरात पंचांसह धाड टाकली असता त्या ठिकाणी एकुण 176 किलो सुगंधित तंबाखु खुल्या व पॅकेटस मध्ये पॅकींग केलेल्या स्वरूपात किं. 3,23,000/—रू चा माल मिळुन आला व सोबतच सुगंतीत तबाखु पॅकींग करण्यासाठी वापरण्यात येत असलेली मशिन किं. 32,000/—रू ची सुध्दा मिळुन आली. सदरचा माल पंचांसमक्ष आरोपीचे घरात अवैधरित्या मिळुन आल्याने तो जप्त करून आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे अन्न सुरक्षा मानके अधिनियम 2006 व कलम 328,188 भादवि अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीस पुढील कार्यवाही कामी पोलीस स्टेशन उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक मोनिका राऊत ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्रावार, सपोनि जितेंद्र वैरागडे, पोहवा संतोष पंधरे, पोहवा मदन आसतकर, पोशि राधेशाम कांबळे, पोशि बालाजी साखरे, चापोहवा भाउराव खंडाते, तसेच अन्न व औषधी विभागाचे निरीक्षक श्री. म.दे.तिवारी, श्री. चहांदे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर